# इचलकरंजी महानगरपालिका,इचलकरंजी.

## Walk in Interview सूचना (जाहिरात)

इचलकरंजी म.न.पा. च्या विविध विभागाकडील खालील नमूद पदे तात्पुरत्या स्वरुपात (कंत्राटी / करार पद्धतीने सहा महिने मुदतीकरिता) व इकडील अटी / शर्तीस अधीन राहून भरण्याकरिता पात्र व इच्छुक उमेदवार यांना खालील नमूद दिनांकास व स्थळी मुलाखतीकरिता बोलाविण्यात येत आहे.

| अ.क्र. | पदाचे नांव | पदसंख्या | आवश्यक अर्हता |
|---|---|---|---|
| १ | कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) | ०७ | अ) मान्यताप्राप्त विद्यापीठाची स्थापत्य अभियांत्रिकी शाखेची पदवी,<br>ब) स्थापत्य अभियांत्रिकी शाखेतील पदव्युत्तर पदवी परीक्षा उत्तीर्ण असल्यास प्राधान्य,<br>क) संगणकीय कामकाज येणे आवश्यक, ड) मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक,<br>इ) अनुभव धारकास प्राधान्य |
| २ | कनिष्ठ अभियंता (यांत्रिकी) | ०१ | अ) मान्यताप्राप्त विद्यापीठाची यांत्रिकी अभियांत्रिकी शाखेची पदवी परीक्षा उत्तीर्ण<br>ब) यांत्रिकी अभियांत्रिकी शाखेतील पदव्युत्तर पदवी परीक्षा उत्तीर्ण असल्यास प्राधान्य,<br>क) अनुभव धारकास प्राधान्य<br>ड) संगणकीय कामकाज येणे आवश्यक, इ) मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक |
| ३ | कनिष्ठ अभियंता (Software) | ०१ | अ) मान्यताप्राप्त विद्यापिठाची संगणक अभियांत्रिकी मधील पदवी (B.E. Computer/ B.Tech./ MCA) उत्तीर्ण<br>ब) प्रोग्रॅमिंग / सॉफ्टवेअर डेव्हलपमेंट मधील किमान ५ वर्षाचा अनुभव आवश्यक<br>क) मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक |
| ४ | कनिष्ठ अभियंता (हार्डवेअर व नेटवर्क) | ०१ | अ) मान्यताप्राप्त विद्यापिठाची संगणक अभियांत्रिकी मधील पदवी (B.E. Computer/ B.Tech./MCA) उत्तीर्ण.<br>ब) संगणक देखभाल दुरुस्तीचा ०३ वर्षाचा अनुभव आवश्यक<br>क) मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक |
| ५ | पशुशल्यचिकित्सक | ०१ | अ) मान्यता प्राप्त विद्यापीठाची पशुवैद्यकिय शास्त्रातील पदव्युत्तर पदवी.<br>ब) अनुभवधारकास प्राधान्य, क) संगणकीय कामकाज येणे आवश्यक,<br>ड) मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक, |

**अटी / शर्ती**

१) सदर नियुक्ती सहा महिने कालावधीकरिता निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात करार पद्धतीने ठोक मानधनावर करण्यात येणार असून नियुक्त उमेदवारास विहित किमतीच्या मुद्रांकावर करार करून देणे बंधनकारक राहील. मुदतीनंतर आवश्यकता भासल्यास मुदतवाढ देणे किंवा नियुक्ती कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्याचे अधिकार मा.आयुक्त, इचलकरंजी महानगरपालिका यांना असतील.

२) देण्यात येणारी नियुक्ती ही निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात करार पद्धतीने असल्याने म.न.पा. नियमित कर्मचा-यांना देय असणा-या कोणत्याही सवलती, लाभ देय असणार नाहीत. तसेच म.न.पा.सेवेत घेण्याबाबत कोणत्याही प्रकारचा हक्क सांगता येणार नाही किंवा न्यायालयात दाद मागता येणार नाही.

३) नमूद पदासाठीची विहित अर्हता मुलाखतीच्या दिनांकास उमेदवाराने धारण केली असणे आवश्यक आहे.तसेच वयोमर्यादा अर्ज सादर करण्याच्या दिनांकास किमान १८ वर्षे व कमाल ४५ वर्षे अशी राहील.

५) नियुक्त उमेदवारास रु. २६,२७२/- प्रतिमहा मानधन देय असेल.

६) मुलाखतीसाठी स्वखर्चाने व निर्धारित वेळेत उपस्थित राहणे आवश्यक आहे.

७) प्रस्तुत जाहिरात / नियुक्ती प्रक्रीयेसंदर्भात काही नवीन सूचना द्यावयाच्या झाल्यास त्या म.न.पा.चे ichalkaranjimnp.in या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येतील. उमेदवारांनी नमूद संकेतस्थळ वेळोवेळी अवलोकन करावे.

तरी उक्त अर्हता धारण करणा-या इच्छुकांनी त्यांचे अर्ज आणि शैक्षणिक व अनुभवविषयक कागदपत्रांसह दिनांक .०८.२०२५ रोजी सकाळी ११.३० वाजता अर्ज व अर्हताविषयक अभिलेखांसह निम्नस्वाक्षरीत यांचे कार्यालयात मुलाखतीस उपस्थित रहावे. यासंबंधी अधिक माहिती म.न.पा.चे आस्थापना व सामान्य प्रशासन विभागाकडे कार्यालयीन कामकाजाचे दिवशी व वेळेत तसेच म.न.पा.चे ichalkaranjimnp.in या संकेतस्थळावर पहावयास मिळेल.

जा.क्र.आस्था.व सा.प्र.वि./कावि ०१/८०१/२०२५,
दिनांक १८.०८.२०२५

इचलकरंजी महानगरपालिका स्थापना २०२२

सही /-
(सुषमा शिंदे-कोल्हे)
अति.आयुक्त,
इचलकरंजी महानगरपालिका.